# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.07.2026** **वारःगुरुवार**

---

1. भारत-ऑस्ट्रेलिया दरम्यान तिसऱ्या वार्षिक परिषदेत सहभागी होण्यासीठी पंतप्रधान नरेंद्र मोदी मेलबर्नमध्ये दाखल
2. ब्रिक्स देशांतील महिलांच्या मंत्रीस्तरीय बैठकीचं कोचीमध्ये आयोजन
3. इराण अमेरिकेदरम्यानचा संघर्ष पुन्हा उफाळला आणि
4. विम्बल्डन कनिष्ठ गट स्पर्धेत भारताच्या अर्णव पापरकरचा ऐतिहासिक विजय

**पंतप्रधान**

तिसऱ्या भारत-ऑस्ट्रेलिया वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी काल मेलबर्नला पोहोचले. आज ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांच्याशी ते चर्चा करतील आणि व्यापार, संरक्षण, तंत्रज्ञान, शिक्षण आणि परस्पर जनसंपर्क या क्षेत्रांतील सहकार्य अधिक दृढ करण्यावर या दोन्ही नेत्यांदरम्यान चर्चा अपेक्षित आहे. यामुळे भारत-ऑस्ट्रेलिया सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीला नवी गती मिळेल. पंतप्रधान मोदी 'भारत-ऑस्ट्रेलिया मुख्य कार्यकारी अधिकारी मंचच्या कार्यक्रमांत सहभागी होणार असून, दोन्ही देशांतील उद्योग क्षेत्रातील प्रमुख नेत्यांना ते संबोधित करतील. तसंच, मेलबर्नमध्ये ते भारतीय समुदायाशी संवाद साधतील. आपल्या तीन देशांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात पंतप्रधान ऑस्ट्रेलियाला पोहोचले आहेत.

**IMF**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने चालू आर्थिक वर्षात भारताचा विकासदर 7 टक्के राहण्याचा अंदाज वर्तवल्यामुळे, जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून भारताचे स्थान भक्कम झालं असल्याचं नाणेनिधीच्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक आउटलुक अपडेट' या द्वैवार्षिक अहवालात नमूद केलं आहे. पुढील वर्षात भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनातील वाढीचा दर काहीसा मंदावेल आणि तो 6 पुर्णांक 4 टक्क्यांवर येईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**महिला-बैठक**

ब्रिक्स अध्यक्षपदांच्या कार्यकाळात भारताच्या पंचायती राज मंत्रालयाद्वारे कोची इथंब्रिक्स देशांतील महिलांच्या मंत्रीस्तरीय बैठकीची आज सांगता होणार आहे. महिलांच्या मंत्रीस्तरीय बैठकीदरम्यान विविध देशांच्या मंत्र्यांनी काल मसुदा ठरावावर चर्चा केली. महिला सक्षमीकरण आणि महिलांच्या नेतृत्वाखालील विकास यांसह विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी, मंत्रीस्तरीय बैठकीपूर्वी कार्यगटाची बैठक काल झाली. आज संध्याकाळी या मंत्रीस्तरीय बैठकीचा संयुक्त ठराव स्वीकारला जाण्याची अपेक्षा आहे.

**भारत-म्यानमार**

भारत आणि म्यानमार दरम्यान द्विपक्षीय स्तरावरील संरक्षण सहकार्याबाबत चर्चा करण्यात आली तसंच आतापर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आल्याचं गृह मंत्रालयानं सांगितलं. भारत आणि म्यानमार दरम्यान 23 वी राष्ट्रीय स्तरावरील बैठक काल नवी दिल्लीत झाली.

दोनही देशांदरम्यान दहशतवाद, अमली पदार्थांची तस्करी, शस्त्रांची तसंच मानवी तस्करी, वन्यजीवांची तस्करी, सायबर गुन्हे यांसह इतर प्रकारांसह आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीचा सामना करण्यासाठीच्या सहकार्यावर चर्चा झाली, असंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

**डीआरडीओ**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओनं ओडिशातल्या चंदीपूर इथल्या एकात्मिक चाचणी क्षेत्रात लांब पल्ल्याच्या पिनाका क्षेपणास्त्राची यशस्वी उड्डाण चाचणी घेतली. किमान 60 किलोमीटरच्या पल्ल्यासाठी या क्षेपणास्त्राची चाचणी घेण्यात आली. या क्षेपणास्त्राची रचना पुण्यातील शस्त्रास्त्र संशोधन आणि विकास संस्था म्हणजे एआरडीईनं ऊर्जा सामग्री संशोधन

प्रयोगशाळेच्या सहकार्याने तसंच संरक्षण संशोधन विकास प्रयोगशाळा आणि इमारत संशोधन केंद्राच्या मदतीने केली आहे. या यशस्वी उड्डाण चाचणीबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ आणि लष्कराचं अभिनंदन केलं आहे.

**NTA-परीक्षा पावती**

या महिन्याच्या 17 आणि 18 तारखेला होणाऱ्या सी एस आय आर -यु जी सी नेट-जून 2026 परीक्षेसाठी, राष्ट्रीय चाचणी संस्था, अर्थात एनटीए नं आगाऊ शहर सूचना पावती जारी केली आहे. परीक्षार्थींनी त्यांना नेमून दिलेले परीक्षा शहर जाणून घेण्यासाठी संस्थेच्या, संकेतस्थळावरून आपली स्लिप डाउनलोड करावी असं सूचित करण्यात आलं आहे.

**आंबा**

शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, केंद्र सरकारने तामिळनाडूतील शेतकऱ्यांकडून खोपरा आणि तोतापुरी या प्रकारच्या आंबे खरेदीला मंजुरी दिली आहे. या मंजुरीअंतर्गत राज्यात 87 हजार मेट्रिक टनांहून अधिक खोपराची खरेदी केली जाईल.

**अमेरिका-इराण**

हॉर्मुझच्या सामुद्रधुनीत इराणने जहाजांवर हल्ला केल्यानंतर, अमेरिकेच्या लष्कराने इराणवर पुन्हा एकदा हल्ले करणार असल्याचं जाहिर केलं. इराणच्या या हल्ल्यांमुळे युद्धविराम संपुष्टात आल्याचं राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. इराणविरुद्ध लष्करी कारवाई अधिक कठोर करण्याचा इशारा दिल्यानंतर काही तासांतच अमेरिकी लष्करानं ही घोषणा केली. दरम्यान, इराणमधील दक्षिण किनारपट्टीवरील शहरांमध्ये स्फोटांचे आवाज ऐकू आल्याचे वृत्त इराणच्या प्रसारमाध्यमांनी दिलं आहे.

**पाक निदर्शने**

पाकव्याप्त काश्मीरमध्ये वाढत्या राजकीय अशांततेच्या पार्श्वभूमीवर जॉइंट अवामी ॲक्शन कमिटी या मुख्य निदर्शक गटानं आंदोलनाची हाक दिली आहे. या गटाच्या अटक केलेल्या नेत्यांची सुटका, दळणवळण सेवा पूर्ववत करणे, अन्न आणि औषधांचा अखंडित पुरवठा आणि 38 कलमी कराराची अंमलबजावणी करणे अशा या गटाच्या मागण्या आहेत. मुझफ्फराबाद, रावळकोट, हवेली, पुलंद्री आदी भागातल्या निदर्शनांमध्ये हजारो लोकांनी सहभाग घेतला.

**विधीमंडळ-मुंबई**

मुंबईतील पूरस्थितीवर कायमस्वरूपी उपाय म्हणून 13 हजार कोटी रुपयांचा एकात्मिक पूरनियंत्रण आराखडा केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत दिली.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, महाराष्ट्र सुधारणा विधेयक काल विधान परिषदेत संमत झालं. या विधेयकामुळे कुठल्याही नागरिकावर अन्याय होणार नाही याची ग्वाही देत संयुक्त समितीकडे हे विधेयक पाठवण्याची गरज नसल्याचं गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी स्पष्ट केलं. विधेयकातल्या तरतुदींना विरोध करत विरोधकांनी हे विधेयक मंजूर करताना सभात्याग केला.

**संतज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान**

आषाढी वारीसाठी आळंदीहून ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीने काल पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलं. अवघी अलंकापुरी यावेळी 'ज्ञानोबा माऊली'च्या गजरात दुमदुमून गेली. तत्पूर्वी, आळंदी इथल्या संजीवन समाधी मंदिरामध्ये, ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांची पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या उपस्थितीत विधीवत पूजा करण्यात आली. आजोळघरचा कालचा मुक्काम आटोपून पालखीचं आज पुण्यात आगमन होणार आहे.

जगतगुरू संत श्री तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा काल पिंपरी चिंचवड इथं मुक्कामी होता. दोन्ही संतांच्या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पुणे जिल्हा प्रशासन आणि महापालिकेनं जय्यत तयारी केली आहे.

**मोशी दुर्घटना**

पुण्याजवळ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोशीमधल्या कचरा डेपोत, काल कचऱ्याचा ढीग इमारतीवर कोसळून घडलेल्या दुर्घटनेत सुमारे 23 नागरिक अडकून पडले होते, त्यापैकी, पाच नागरिक स्वतःहून बाहेर पडले, तर 9 नागरिकांना बचाव पथकांनी सुखरूप बाहेर काढलं. उर्वरित नागरिकांना बाहेर काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, लष्कर तसंच महापालिका अग्निशमन दलांचं बचावकार्य सुरू आहे.

**<u>हिंगोली, परभणी भूकंप</u>**

हिंगोली जिल्ह्याला आज पहाटे सलग दीड आणि सव्वा दोनच्या सुमारास भूकंपाचे धक्के बसले. रिख्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता 4 पूर्णांक 6 दशांश इतकी नोंदवण्यात आली असून, भूकंपाचा केंद्रबिंदू वासमत तालुक्यातील पांगरा शिंदे या गावात होता. परभणी मध्ये देखील आज पहाटे 1 वाजून 37 मिनिटांनी भूकंपाचा धक्का जाणवलं. यामध्ये कोणत्याही जीवितहानीचं वृत्त नाही.

**<u>विम्बल्डन</u>**

लंडनमध्ये सुरु असलेल्या विम्बल्डन कनिष्ठ गट स्पर्धेत भारताच्या अर्णव पापरकरने ऐतिहासिक विजय मिळवला. मुलांसाठी असलेल्या एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत त्याने धडक मारली आहे. गेल्या 36 वर्षांत ही कामगिरी करणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला. 18 वर्षांच्या पापरकरने
उप-उपांत्यपूर्व फेरीतजपानच्या यो ताबाताचा 6-2, 6-1 असा पराभव केला. त्याआधी, त्याने अमेरिकेच्या आणि जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर असलेल्या कीटन हॅन्सचा 6-2, 6-3 असा पराभव करून सर्वांना चकित केले होतं. या स्पर्धेत त्याने आतापर्यंत एकही सेट गमावलेला नाही. पापरकर आज सायंकाळी उपांत्यपूर्व फेरीत अमेरिकेच्या जॉर्डन ली याच्याविरुध्द सामना खेळेल. अर्णवने मूळचा पुण्यातील असून त्याने हेमंत बेंद्रे टेनिस अकादमीतून प्रशिक्षण घेतलं आहे.

**<u>बुध्दीबळ</u>**

भारताची 100 व्या ग्रँडमास्टरकडे होणारी वाटचाल काल अधिक वेगवान झाली; हा टप्पा गाठण्यासाठी केवळ दोन ग्रँडमास्टर्सची गरज आहे. काल पुण्यात बुध्दीबळ क्रिडा ट्रस्टच्यावतीनं आयोजित सामन्यात कन्याकुमारीच्या 17 वर्षीय अश्वथ एस. याने 'पुणे इंटरनॅशनल ग्रँडमास्टर राउंड रॉबिन' स्पर्धेत आपला अंतिम 'जीएम नॉर्म' पूर्ण करून देशाचा 98 वा ग्रँडमास्टर होण्याचा मान मिळवला. काल झालेल्या अंतिम फेरीत अश्वथने अमेरिकेच्या एफएम कन्नन वैद्यनाथनचा पराभव केला आणि ग्रँडमास्टर किताब मिळवण्यासाठीच्या सर्व अटी पूर्ण केल्या. त्याने 9 फेऱ्यांत 7 गुण मिळवत दुसरं स्थान मिळवलं. कालच्या स्पर्धेत गँडमास्टर अभिजीत गुप्ता अव्वल स्थानी राहिला.

**<u>पाऊस</u>**

मुंबई पुण्यासह महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये आता पावसाचा जोर ओसरत आहे. केरळमधील पावसाचा जोर काहीसा ओसरत असला तरी, आज उत्तर केरळमधील पाच जिल्ह्यात, जोरदार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. राज्याच्या किनारीभागात मासेमारीसाठी बंदी घालण्यात आली आहे.

उत्तराखंड राज्यात पावसाचा जोर अद्याप कायम असून, पुढील 36 तासांसाठी मुसळधार पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे. मुसळधार पावसामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यात रस्ते वाहतूक विस्कळीत झाली आहे. अत्यावश्यक नसल्यास नागरिकांनी घराबाहेर पडू नये, तसंच चारधाम यात्रेकरूंनी हवामानाचा अंदाज घेऊन पुढील प्रवासाचं नियोजन करावं अशा सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार